## वार्षिक अहवाल २०२३-२०२४

## बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**१०.१अहवालाच्या कालावधीत ग्रंथ व नियतकालिके खरेदीसाठी खालील निधी मंजूर होता.**

अ) विद्यापीठ निधीः रू. २,८५,००,०००/-एवढी अंदाजपत्रकीय तरतूद अहवाल वर्षात नियतकालिके व ग्रंथ खरेदीसाठी उपलब्ध होती. सदर मंजूर निधीतून नियतकालिकासाठी रु. २,६५,००,०००/- व ग्रंथखरेदीसाठी रु.२०,००,०००/-एवढी रक्कम उपलब्ध होती. सदर उपलब्ध निधीतून नियतकालिकांच्या (छापील व ऑनलाईन) आणि ई-संशाधने व डेटाबेस वर्गणीसाठी रु. २४३६४१५९.८२/- आणि ग्रंथ/ई- बुक्स खरेदीसाठी रु. १९,०५,०१६/-चा विनियोग करण्यात आला.

**१०.२ ग्रंथसंग्रहः**

अ) दि.३१/०३/२०२४ रोजी विद्यापीठ ग्रंथालयात वाचनसंग्रह साहित्याची (ग्रंथ, नियतकालिकांचे बांधीव संच व हस्तलिखिते) यांची एकूण संख्या खालीलप्रमाणे होती.

| ग्रंथ | ई-बुक्स | नियतकालिकांचे बांधीव संच | हस्तलिखिते | प्रबंध /लघुप्रबंध | रिपोर्ट | ब्रेल बुक्स | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २,८२,५१० | १,२४९ | ३८,९८९ | ९,१६३ | १२,३८९ | ७,०९० | ५९० | ३,५१,९८० |

**ब) अहवाल वर्षातील वाढः** २०२३-२४ या अहवाल वर्षात विद्यापीठ निधीतुन १८८९ ग्रंथ खरेदी केलेले आहेत. कॉन्टीजन्सीद्वारे १५९ ग्रंथ खरेदी केले आहेत. देणगीद्वारे आलेल्या ग्रंथांची संख्या २८८ एवढी आहे. अशा रितीने, अहवाल वर्षातील एकूण ग्रंथसंख्या वाढ २३३६ आहे.

विद्याशाखा निहाय खरेदी केलेले ग्रंथ/ई-ग्रंथ यांची विभागणी पुढीलप्रमाणेः

| अ. क्र. | विद्याशाखेचे नाव | ग्रंथ | ई-ग्रंथ |
|---|---|---|---|
| १. | सायन्स आणि टेक्नॉलॉजी | २०५ | ३९ |
| २. | वाणिज्य आणि व्यवस्थापन | २५ | १४ |
| ३. | मानव्य विद्याशाखा | ३९१ | - |
| ४. | आंतरविद्याशाखा | १५९ | - |
| ५. | सामान्य | ११०९ | - |
| | **एकुण :-** | **१८८९** | **५३** |

क) कॉन्टीजन्सीमधून खालीलप्रमाणे १५९ ग्रंथ संशोधन प्रकल्प /इतर योजना /इतर कोर्सेस व संशोधन योजने अंतर्गत खरेदी केले आहेत.

| Sr. No. | Budget Heads under Projects | No. of Books |
|---|---|---|
| 1 | Applied Chemistry (A.63.P.4) | 25 |
| 2 | Commerce & Management (MBA )(A.57.P.4) | 86 |
| 3 | Ind. Chemistry (A.21.P.4) | 5 |
| 4 | Libraray & Information Science (D.2.P.351) Name of Teacher- Dr. P. B. Bilawar (ICSSR Minor Research Project) | 9 |
| 5 | Psychology (A.69.P.4) | 17 |
| 6 | YCSRD (A.67.P.4) | 17 |
| | **Total** | **159** |

**ड) अहवाल वर्षात देणगीदारांकडून देणगीदाखल प्राप्त झालेल्या पुस्तकांची संख्या खालीलप्रमाणे आहे.**

**1) ग्रंथ खरेदी विभाग**

| अ.क्र. | देणगीदाराचे नाव | पुस्तकांची संख्या |
|---|---|---|
| १. | रामदास खुटवड | ०३ |
| २. | एच. एल. लक्ष्मण, धनवाड | ०७ |
| ३. | एजन्सी फॉर द लिगल डिपॉझीट लायब्ररी, जयसिंगपूर | ०३ |
| ४. | राजेंद्र घोरपडे, कोल्हापूर | १० |
| ५. | दिनकर विष्णू पाटील, कोल्हापूर | ०३ |
| ६. | अंकिला श्रीनिवासन, केरळा | ०४ |
| ७. | कुलगुरु कार्यालय, कोल्हापूर | ७६ |
| ८. | चंद्रकांत माळवदे, मुरगुड | ०३ |
| ९. | डॉ. पी. एस. पाटणकर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ०५ |
| १०. | सुमन किराणे, कोल्हापूर | ०५ |

| | | |
|---|---|---|
| ११. | सी. आर. पाटील, कोल्हापूर | ०६ |
| १२. | राजेंद्र  झुंजारराव, पुणे | ०३ |
| १३. | सुनिल दादा पाटील, जयशिंगपूर | ०६ |
| १४. | शिशिर | ०४ |
| १५. | अविनाश पाटील, सांगली | ०४ |
| १६. | सुनीलकुमार लवटे, कोल्हापूर | ०४ |
| १७. | नॅशनल  कॉन्फरन्स, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र | ०३ |
| १८. | महावीर अध्यासन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १६ |
| १९. | किरण जगदाळे, बार्शी | ०९ |
| २०. | सेंटर फॉर स्टडीज इन सिव्हीलायझेशन | ०३ |
| २१. | सुभाष धुमे, कोल्हापूर | ०९ |
| २२. | प्रवीण चौगले, कोल्हापूर | ०४ |
| २३. | संजय चोपडे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ०३ |
| २४. | चित्रा एम. गोस्वामी | ०९ |
| २५. | खुसरो फाऊंडेशन, नई दिल्ली | ०३ |
| २६. | इतर | ८३ |
| | एकूण:- | २८८ |

**इ) नियतकालिके विभागः**

अहवाल वर्षात १३ विदेशी ऑनलाईन नियतकालिके आणि १४ (JSTOR Archive Journal & Primary Source, Institute of Physics, J-Gate Science and Technology, J-Gate Social Science and Humanities, Cambridge University Press, Taylor and Francis, Wiley, Emerald ESS Journals, APS All Package-Online Access, Oxford University Press, SciFinder Academic Unlimited Access Plan, Science Direct 7 Subject Collection, Scopus, EPWRF India Time Series & Knimbus) डेटाबेस  ची खरेदी करण्यात आली तसेच ७३ भारतीय मुद्रित नियतकालिके खरेदी करण्यात आली व त्याप्रमाणे ती ग्रंथालयास प्राप्त झाली. ११२ छापील नियतकालिके देणगी स्वरूपात प्राप्त झालेली आहेत. तसेच मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेतील १० वर्तमानपत्रे वाचकांसाठी उपलब्ध केली आहेत.

**फ) प्रबंध - लघु प्रबंध व अहवाल विभागः**

अहवाल वर्षात १९ अहवालांची विभागात भर पडली. तसेच इन्फ्लिबनेट च्या 'शोधगंगा' या संकेतस्थळावर अहवाल कालावधी अखेर एकूण ४९४७ प्रबंध उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**१०.३ ग्रंथालयीन सेवाः**

**अ-पुस्तके व नियतकालिके देवघेव:**

वृत्तांत वर्षात नोंदलेल्या वाचकांची संख्या ४७४८ एवढी आहे. या वर्षात देवघेव विभाग व टेक्स्ट बूक विभाग येथून एकूण ४५,०८४ ग्रंथांची देवाणघेवाण करण्यात आली. तसेच संलग्न महाविद्यालयातील व शैक्षणिक संस्था मधील ४ शिक्षकांनी ग्रंथालय सेवेचा लाभ घेतला. ग्रंथालय विभागात विद्यार्थ्यांनसाठी 'मुक्तद्वार प्रवेश पध्दत' उपलब्ध आहे.

१. एकूण १५ वाचकांना आवश्यक ते शुल्क भरून संदर्भ सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

२. एकूण १६ ज्येष्ठ नागरिकांनी प्रत्येकी रु. १०००/- याप्रमाणे अनामत रक्कम भरून ग्रंथालयाचे कायमचे सभासदत्व घेतले आहे.

३. स्पर्धा परीक्षा व नेट / सेट इत्यादी परीक्षांना बसलेल्या १६० विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत बसण्यासाठी प्रत्येकी रू. १६१/- मासिक शुल्क भरून ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

४. एकूण ११ वाचकांनी झेरॉक्स सुविधेचा लाभ शुल्क भरून घेतला.

५. अहवाल वर्षापर्यंत एकूण १९२२ विविध विषयांवरील सीडी रोम उपलब्ध आहेत.

**ब.१. अभ्यासिका: बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रः**

राष्ट्रीय सुट्टीचे दिवस सोडून इतर सर्व दिवशी सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत अशी १८ तास अभ्यासिका सुरू ठेवण्यात आली. अभ्यासिकेमध्ये दररोज सरासरी ४०३ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. सदर अभ्यासिकेचे व्यवस्थापन डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनातील 'कमवा व शिका' या योजनेतून शिक्षण घेणाऱ्या अंशकालीन विद्यार्थ्यांमार्फत करण्यात आले.

**ब.२. अभ्यासकेंद्र ( विमान बिल्डिंग ):**

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील सर्व संलग्न महाविद्यालयातील पदवीपूर्व विद्यार्थी व विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी यांना वाचनाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी अभ्यासकेंद्राची स्थापना करण्यात आली आहे. एम.फिल., पी. एच. डी. विद्यार्थी तसेच नेट / सेट व स्पर्धा परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या अभ्यासिकेत प्रवेश दिला जातो.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात कोल्हापूर शहरातील विविध महाविद्यालयात शिकणाऱ्या १६९ विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत प्रवेश देण्यात आला. नेट / सेट व स्पर्धा परीक्षेच्या तसेच पदव्युत्तर विभागातील २५० विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेचा उपयोग करून घेतला.

हे अभ्यासकेंद्र दररोज व सर्व रविवार तसेच सुट्टयांच्या दिवशी सकाळी ६ ते रात्री १२ असे १८ तास अभ्यासासाठी खुले असते.

या केंद्रात पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी लागणारी क्रमिक पुस्तके व संदर्भ ग्रंथ ठेवण्यात आले असून ती ओळखपत्रावर संदर्भासाठी दिली जातात.

एकूण ग्रंथांची संख्या १३,६४८ इतकी आहे तसेच ०६ वर्तमानपत्रे विद्यार्थ्यांना वाचनाकरिता उपलब्ध करुन दिली आहेत. प्रति विद्यार्थी रु. २५७/- फक्त ग्रंथालय शुल्क म्हणून आकारण्यात आले. अभ्यासिकेमध्ये वाचकांच्या हजेरीचे प्रमाण २८०इतके होते. पदव्युत्तर विभागातील काही प्राध्यापकांनी या अभ्यासकेंद्राच्या सुविधांचा उपयोग करून घेतला.

**क -नियतकालिक विभागः**

नियमित व संशोधक विद्यार्थ्यांच्या वाढत्या मागणीची गरज भागविणेसाठी नियतकालिक विभाग कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.२० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत असा ७.३० तास कार्यान्वित होता. सदर विभागाचा दररोज सरासरी १८ वाचकांनी लाभ घेतला. शिक्षणासाठी व संशोधक विद्यार्थ्यांसाठी ॲकॅडमीक रिसोर्स सेंटरची सेवा पुरविण्यात आली

**ड: अर्काइव्हल सेल विभाग**

अर्काइव्हल सेल विभागातील ४८,०१४ दूर्मिळग्रंथ व ९,१६३ हस्तलिखिते बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रात उपलब्ध आहेत. अहवाल सालात २२५८ संशोधकांनी व वाचकांनी या विभागाच्या सेवांचा लाभ घेतला.

**ई: प्रबंध, शोधनिबंध, अहवाल व संदर्भ विभागः**

या विभागात एम. फील., पी. एच. डी., लघु व दीर्घ संशोधन प्रबंध, शोधनिबंध, लोकसंख्या अहवाल (सेन्सस रिपोर्ट), जिल्हानिहाय सांख्यिकी अहवाल व संदर्भ साधने, इत्यादी संशोधक /अभ्यासकांच्या उपयोगासाठी ठेवले आहेत. या कालावधीत ६०५ संशोधक विद्यार्थ्यांनी या विभागाचा लाभ घेतला. या विभागात विविध विषयांवरील एकूण ८१४२ पुस्तके संदर्भासाठी उपलब्ध आहेत.

**फ: समावेशी शिक्षण संसाधन केंद्र ( आर. सी. आय. ई.) :**

राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रूसा) कार्यालय, महाराष्ट्र शासनाने शिवाजी विद्यापीठास समावेशी शिक्षण संसाधन केंद्र स्थापण्यास मंजूरी दिलेली आहे. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राच्या विस्तारीत इमारतीमध्ये हे केंद्र कार्यान्वित आहे. शिवाजी विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयातील, अधिविभागातील, विशेष शाळेतील सक्षम नसलेले दृष्टीहीन, श्रवणदोष, शारिरीकरित्या अपंगत्व व मानसिक दृष्टया अकार्यक्षम असलेल्या विद्यार्थ्यांचा विकास व समावेश यासाठी हे केंद्र काम करते. या केंद्रामध्ये ब्रेल बूक्स,ई-रिसोर्सस, संगणक व स्क्रिन रिंडिंग सॉफ्टवेअर, इंटरनेट / वायफाय, लो व्हिजन डिवाइसेस (मॅग्नीफायर, सी.सी.टी.व्ही, चष्मे इत्यादी ) लो व्हिजन विद्यार्थ्यांसाठी आधुनिक उपकरणांचा समावेश आहे.

**RCIE चे वापरकर्ता तपशीलः**

| अ. नं. | वापरकर्ते अपंगत्व प्रकार | वापरकर्त्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | दृष्टीदोष | ३६ |
| २. | शारीरिक कमजोरी | ५५ |
| ३. | श्रवणकमजोरी | ५७ |
| | वापरकर्त्यांची एकूण संख्या | १४८ |

**१०.४ ग्रंथालय संगणकीकरण सद्यस्थितीः**

ग्रंथालयातील वाचन साहित्याचे Retroconversion SOUL 3.0 या संगणक प्रणालीत करण्याचे काम सुरू असून सदर वाचन साहित्याची सुचीबद्ध माहिती OPAC / WebOPAC/m-OPAC इंटरनेटद्वारे उपलब्ध करण्यात आलेली आहे. याबरोबरच नव्याने खरेदी केलेल्या पुस्तकांचे उपार्जन, तालिकीकरण, तांत्रिक प्रक्रिया व ग्रंथदेव-घेव मोडयुल्स इ. SOUL या संगणक प्रणालीत चालू करण्यात आलेल्या आहेत. OPAC इंटरनेट आणि ई-रिर्सोसेस इत्यादी ऑनलाईन सुविधा देखील ३३ संगणकांमार्फत, २ वर्कस्टेशन्स व २५ टर्मीनलमार्फत दिल्या जातात. ग्रंथ देवघेव बाबत एसएमएस आणि ई-मेल सुविधा प्रत्येक वाचकाला SOUL 3.0 मार्फत सुरु करण्यात आली आहे.

**१०.५ शिव ज्ञानसागरः-**

शिव ज्ञानसागरः शिवाजी विद्यापीठाची इंस्टिटयुशनल रिपॉझिटरी आहे. शिव ज्ञानसागर हे वार्षिक अहवाल, दीक्षांत समारंभातील भाषणे, फोटो, प्रबंध, पेटंट्स, संशोधन पेपर्स, कॉन्फरन्स प्रोसिडिंग्स, वृत्तपत्रे, प्राध्यापकांची प्रकाशने आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रकाशने तसेच इतर प्रकाशनांच्या प्रसारासाठी एक संस्थात्मक इंस्टिट्युशनल रिपॉझिटरी आहे. सदर रिपॉझिटरीमध्ये प्रकाशने संग्रह करणे, इंडेक्स करणे, प्रसार आणि जतन करण्याची क्षमता आहे. शिवाजी विद्यापीठाच्या ई-वापरकर्ता समुदायासाठी तसेच समाजासाठी हे उपयुक्त ई-संसाधन संग्रह आहे. एकूण ३६६२ इतके फुल-टेक्स्ट वाचन साहित्य २४ × ७ उपलब्ध आहे.

**१०.६ ग्रंथ बांधणी-**

अहवाल सालात ३७६ नियतकालिकांचे अंक बांधणी करून घेण्यात आले.

**१०.७ विद्यापीठातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याच्या मुलांना क्रमिक पुस्तके देण्याची योजना:**

०१ जुलै २०२३ ते ३० जुन २०२४ या कालावधीत २५ क्रमिक पुस्तकांचा लाभ ३ कर्मचाऱ्याच्या ३ मुलांनी या योजनेअंतर्गत घेतला आहे.

**१०.८ शिक्षकांची वैयक्तिक ग्रंथालय योजनाः**

०१ जुलै २०२३ ते ३० जुन २०२४ या कालावधीत १७ शिक्षकांनी व कर्मचाऱ्यानी असे मिळून एकुण १७ जणांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

**१०.९ ग्रंथालय भेटीस आलेले वाचक / पर्यटकः**

अहवाल सालात महाविद्यालये /शैक्षणिक संस्था येथील सहली व अभ्यास सहलीसाठी आलेले एकूण १७११ विद्यार्थी /पर्यटक यांनी बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रास भेट दिली.

**१०.१० विशेष घटनाः**

१.दि. २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिवस या निमित्ताने “विकसित भारतासाठी स्वदेशी तंत्रज्ञान” या विषयावरील ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

२.दीक्षांत समारंभ ग्रंथमहोत्सव डिसेंबर-२०२३ निमित्त दि. १६ ते १८ डिसेंबर, २०२३ दरम्यान एक भव्य ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

३.विद्यापीठातील नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय उद्बोधन कार्यक्रम ४ व ५ डिसेंबर, २०२३ या कालावधीत व्याख्यान सादरीकरणाव्दारे ग्रंथालयाची माहिती सादर करून (पी.जी. आणि संशोधक विद्यार्थी) करिता आयोजित करण्यात आले होते आणि त्यानंतर ६ डिसेंबर ते १२ डिसेंबर, २०२३ दरम्यान ग्रंथालय अभ्यास दौरा विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता.

४.मुंबई बॉम्बस्फोटातील पोलीस कर्मचाऱ्याच्या बलिदानाचा सन्मान करण्यासाठी दि. २६ नोव्हेंबर २०२३ रोजी ‘शहीद दिन’ साजरा करण्यात आला आणि त्याच दिवशी ‘भारतीय संविधान दिन’ देखील साजरा करण्यात आला.

५. दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी सर्व विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय “वाचन प्रेरणा दिन” कार्यक्रम आयोजित केला होता. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी ‘का वाचावे? आणि काय वाचावे? या विषयावर अप्रतिम व्याख्यान दिले.

६. ग्रंथालयाचे आय. एस. ओ. ९००१: २०१५ री- सर्टिफिकेशन ऑडिट २६ सप्टेंबर, २०२३ रोजी झाले.

७. १ऑगस्ट २०२३ रोजी ‘बॅ. बाळासाहेब खर्डेकर जयंती’ साजरी करण्यात आली.

८. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अधिविभागाच्या ६० व्या स्थापना दिनाच्या पूर्वसंध्येला बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र आणि ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अधिविभागाच्या वतीने दि. २१ जुलै, २०२३ रोजी “रिव्हॅम्पिंग लायब्ररीज् इन मॉर्डन इरा” या विषयावर संयुक्तपणे एक दिवसीय राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती.